सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२६/3116
दिनांक :20 NOV 2026

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित
पदविका अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या माहितीची पडताळणी करुन सदर माहिती पोर्टलवर लॉक करण्याबाबत

संदर्भ:- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. १०/पदविका-मा.प्र./पदविका प्रवेश यादी/२०२६-२७/५५१, दिनांक २७/१०/२०२६

२. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/परिपत्रक/२०२६/३००६, दि. ०४/११/२०२६

२.या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/गु.या/२०२६/२६७६, दि. २९/१०/२०२६

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी व वास्तुकला पदविका, थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका तसेच इ.१२ वी नंतरचे औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानुषंगाने संदर्भीय पत्रान्वये या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्यांची पडताळणी करुन ऑनलाईन पध्दतीने अंतिम मान्यतेसाठी खालील कार्यपध्दतीनुसार संचालनायास सादर कराव्यात.

प्रवेश याद्यांची ऑनलाईन पडताळणी व मान्यतेची प्रक्रिया खालिलप्रमाणे राहिल.

ऑनलाईन पडताळणीबाबत संस्थांनी करावयाची कार्यवाही:

१.संस्थांनी त्यांच्या Login मधून Online पध्दतीने प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी पडताळणी करण्याकरिता पाठविण्यापूर्वी खालिल बाबींची पूर्तता / खात्री करणे आवश्यक आहे. त्यानंतर ती यादी Online पध्दतीने संबंधित विभागीय कार्यालयास पडताळणीसाठी सादर करावी.

i.सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशपात्रतेनुसार आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व्यवस्थितपणे Upload झालेली आहेत किंवा नाहित, याची खात्री करुन घ्यावी.

ii.प्रवेश पात्रतेनुसार आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे Upload झालेली नसल्यास प्रथमत: संस्थांनी त्यांच्या Login मधून सर्व विद्यार्थ्यांच्या पात्रतेची सर्व मूळ कागदपत्रे Upload करावीत.

२.सदर यादी संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध असून यादी Forward करण्याअगोदर Cut-off दिनांकानंतर संस्थांस्तरावर प्रवेश रदद झाला असल्यास त्याची नोंद Mark for Cancellation ही Link वापरुन करणे अत्यंत आवश्यक आहे.

३. Institute Login मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी व त्यासोबत विद्यार्थ्यांची आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे दर्शविली आहेत. संस्थेने विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे विभागीय कार्यालयाने नियुक्त केलेल्या पडताळणी अधिकाऱ्यांकडे (Scrutiny Officer) विभागीय कार्यालयाच्या वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष जाऊन पडताळणीसाठी सादर करावीत.

४.संस्थांनी Institute Login मध्ये उपलब्ध Report (प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी) चे Print-Out घेवून त्यावर विद्यार्थ्यांची आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रांच्या उपलब्धतेनुसार नोंदी घ्याव्यात व संस्थेचे प्राचार्य यांचे स्वाक्षरीसह विभागीय कार्यालयास सादर करावेत.

५. प्रवेश याद्यांची ऑनलाईन पडताळणी झाल्यावर संस्थेच्या लॉगिन मध्ये, संचालनालयाकडून मान्यता प्राप्त प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रमाणपत्र उपलब्ध होईल.

वरिल सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन संपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास ऑनलाईन पध्दतीने **दि.२७/११/२०२६ पर्यंत** सादर करावा तसेच परिपूर्ण प्रस्ताव सादर करतांना कोणतीही त्रुटि राहणार नाही त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील, याची व्यक्तीशः नोंद घ्यावी.

Shankar

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती

*पोर् टल लकि: https://mverification26.dtemaharashtra.gov.in/merit26/